**दि.16 मे,2017 रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील कार्यवाहीचे मुद्दे पुढीलप्रमाणे-**

| अक्र | मुद्दा | विभाग | |
|---|---|---|---|
| 1. | दिनांक 16 मे 2017 रोजी अनुपस्थित असलेले गविअ तसेच राज्य स्तरीय अधिकारी हे सन्मा.अध्यक्ष यांची परवानगी न घेता गैरहजर होते,सदर अधिका-यांवर गैरहजेरीबाबतची कडक कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करावा. | साप्रवि | |
| 2. | सन 2014-15,15-16 मध्ये प.स.नांदगांव खंडेश्वर अंतर्गत टाकळी-कवडा ते कोहळा 13 किमी सदर कामावर वेगवेगळया निधीतून रस्ता बांधकाम आणि दुरुस्तीवर झालेल्या खर्चाबाबत चौकशी करुन अहवाल सादर करावा.एकाच ठिकाणी खर्च का करण्यात आला? | बांधकाम | |
| 3. | साखरा ता.नांदगावं खंडेश्वर येथे करण्यात आलेल्या कामाचा निष्कृष्ट दर्जाचे झालेले आहे.क्रॉकीटीकरण संपूर्ण रस्त्यांवर फक्त 4 इंची झालेले आहे.सदर कामाची ट्रॉयल पीट (Trial Pit) घेवून स्वत: कार्यकारी अभियंता यांनी चौकशी करुन सदर कामासाठी मा.अध्यक्ष,मा.सभापती तसेच कार्यकारी अभियंता (बांधकाम),यांनी संयुक्त चौकशी समिती स्थापन करुन कार्यवाही करावी, पुढील बैठकीत अहवाल सादर करावा. | बांधकाम | |
| 4. | वरखेड येथील आरोग्य केंद्राची इमारत ही अत्यंत जिर्ण झालेली आहे.बांधकाम विभागाने याबाबतचा संपूर्ण गोषवारा पुढील बैठकीत बोलवावा.इमारत प्रथम तपासुन घ्यावी.शिकस्त झाली किंवा कसे? | बांधकाम | |
| 5. | प.स.नांदगांव खंडेश्वर अंतर्गत सन 2015-16,16-17 यामध्ये नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास अंतर्गत प्राप्त झालेला निधी,अखर्चित निधी आणि खर्च झालेला निधी,इ.बाबतची माहिती,प.स.नांदगांव खं.गविअ यांनी द्यावी.तसेच संपूर्ण जिल्हयाच्या खर्च आणि पूर्ण अपूर्ण कामाची तालुका निहाय माहिती सादर करावी. | गविअ नांदगांव / सर्व गविअ /समाजकल्याण अधिकारी | |
| 6. | प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नांदगावं खंडेश्वर येथील संपूर्ण माहिती सादर करावी. | प्रकल्प संचालक जिग्राविय | |
| 7. | वाढोणा रामनाथ येथील सरकारी जमिनीचा 8-अ खाजगी व्यक्तीला देण्यात आल्याची तक्रार आहे.याबाबतचा तपशील पुढील बैठकीत सादर करावा. | पंचायत | |
| 8. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर शेती स्वावलंबन याजनेअंतर्गत करण्यात आलेला तसेच पुढील नियोजनाबाबतचा तपशील सादर करावा. | कृषी | |
| 9. | ग्रा.प.खिरसाना प.स.नांदगांव खंडेश्वर अंतर्गत लाभार्थींना चेक मिळत नसल्याची तक्रार आहेत.याबाबत मंजुर झालेल्या कामानुसार अहवाल सादर करावा. | गविअ प.स.नांदगांव | |

| अक्र | मुद्दा | विभाग | |
|---|---|---|---|
| 10. | प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत प.स.धारणी येथील कामाची स्थिती सादर करावी. | प.स.धारणी | |
| 11. | मग्रारोहयो अंतर्गत धारणी-चिखलदरा अंतर्गत कुशल कामाची स्थिती, तसेच प्रलंबित पेमेंटची स्थिती सादर करावी. | उपमुकाअ नरेगा | |
| 12. | जनधन योजनेतंर्गत लाभार्थींचे खाते जिल्हा मध्यवर्ती बँकेत उघडण्याबाबत मागणी आहे,याबाबत तपासून माहिती ठेवावी. | प्रकल्प संचालक जिग्रावियं | |
| 13. | धारणी येथील जि.प.विश्रामगृह येथे पिण्याचे पाण्याची व्यवस्था नाही. याबाबत बांधकाम विभागाने त्वरीत कार्यवाही करावी. | बांधकाम | |
| 14. | विश्रामगृह अमरावती येथील व्यवस्था तसेच अंतर्गत व्यवस्थेबाबत अनेक तक्रारी असल्याने त्याबाबत त्वरीत उपाययोजना करावी.सदरची बाब तातडीने करण्यासाठी सर्वप्रथम विश्रामगृहावर सध्या नियुक्त असलेला कर्मचारी वर्ग त्वरीत बदलण्यात यावा. | बांधकाम | |
| 15. | डिजीटल स्कुल करण्याबाबत ज्यांनी प्रस्ताव तयार केलेला नाही.त्यांचे विरुध्द कारवाईचा करण्यात यावी.यामध्ये काही अडचणी असल्यास लेखाशिर्षक बदल करता येईल काय?याबाबत माहिती द्यावी. | शिक्षण | |
| 16. | सीबीएससी शाळेतील फी वाढीच्या संदर्भात अनेक तक्रारी आहेत. याबाबत पालकसभेत-मुख्याध्यापक यांच्यात झालेल्या बैठकीची माहिती घेवून पुढील सभेत माहिती ठेवावी.सभेत सीबीएससी अंतर्गत मंजुर तुकडया,परवानगी तसेच शानि माहिती सभेत ठेवावी.याबाबत शिक्षणाधिकारी यांनी आकस्मिक तपासणी करुन प्रवेशक्षमता तपासावी.याबाबत क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी असल्यास काय कारवाई करता येईल,याबाबची माहिती पुढील बैठकीत ठेवावी. | शिक्षणाधिकारी माध्यमिक | |
| 17. | चांदूर रेल्वे,धामणगांव रेल्वे येथील गविअ मुख्यालयी हजर राहत नसल्याची तक्रार आहे किंवा कसे याबाबतचे स्पष्टीकरण पुढील बैठकीत कारवाईसह ठेवावे. | साप्रवि | |

सर्व खातेप्रमुख जि.प.यांनी वरील मुद्दयांचा अनुपालन अहवाल दि.31 मे 2017 पर्यंत स्थायी समितीचे सचिव उपमुकाअ (सामान्य) यांचेकडे सादर करावा.

(डॉ.किरण कुलकर्णी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अमरावती